**नि.दि.दा.नंबर १३९/२०२५ मधील निशाणी ०९ चे अर्जावरील आदेश.**

**(सविता शिंदे वगैरे वि. बाळासो शिंदे वगैरे )**

प्रस्तुतचे अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ व ऑर्डर १ रुल १० अन्वये दुरुस्ती करणेसाठी दिलेला आहे.

**अर्ज कथने संक्षिप्तेत खालील प्रमाणे:–**

२. प्रस्तुतचा दावा वादी यांनी सरस निरस मानाने तुटक वाटप होवून तुटक कब्जा मिळणेकरीता व निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. वादीच्या अर्जातील कथनानुसार प्रस्तूतचा दावा दि. १६.१०.२०२५ रोजी दाखल केला आहे. दावा दाखल करणेपूर्वी प्रतिवादी क्र. १ यास पोस्टाद्वारे नोटीस पाठवून वाटप करुन देणेबाबत कळवले होते. सदरची नोटीस प्राप्त झाल्यानंतर प्रतिवादी क्र. १ यांनी दि. १७.१०.२०२५ रोजी दावा मिळकत गट नं. १०४१ मधील १आर क्षेत्राची नोंदणीकृत खरेदीखत दस्त क्र. ५३९८/२५ अन्वये तेजस दिलीप शिंदे रा. बोरगांव, ता. कवठे महांकाळ यांना विक्री केलेली आहे. सबब सदर खरेदीदारास या दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. ५ म्हणून समाविष्ट करणे तसेच सदरचे खरेदीखत वादीच्या हिश्यावर बंधनकारक नाही असे जाहीर होवून मिळणेबाबतचा मजकूर दाव्यामध्ये दुरूस्ती करुन समाविष्ट करणे आवश्यक असल्याचे वादीचे कथन आहे. त्या अनुषंगाने वादी दाव्याच्या टायटल क्लॉजमध्ये तूटक कब्जा मिळणेकरीता यानंतर डिक्लरेशन करीता असा मजकूर तसेच दाव्याची किंमत १३६०० ऐवजी १४६०० अशी दुरूस्ती करू इच्छीत आहे. या शिवाय दाव्याचे कलम नं. ५ मध्ये खरेदीखत

समजून आले ती तारीख नमूद करु इच्छीत आहे. सदर दुरूस्तीच्या अनुषंगाने विनंती कलमामध्ये मजकूर समाविष्ट करु इच्छीत आहे. याशिवाय दाव्याचे कलम नं. ७ मधील विनंती पोट कलम क मध्ये ओळ नं. २ मध्ये व २ नंतर आणि प्रतिवादी क्र. ३ असे नमुद करण्याची परवानगी मागत आहे. वादीच्या कथनानुसार सदरच्या दुरस्ती केल्यामुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. याउलट दावा गुणदोषावर निकाली काढण्यास मदतच होणार आहे.

**३.** प्रस्तूतच्या दाव्यामध्ये अद्याप प्रतिवादींना नोटीस काढण्यात आलेल्या नसून प्रतिवादी दाव्यात हजर नाहीत.

**४.** वरील कथनांवरून माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह त्यापुढे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी मागणी केल्यानुसार दुरूस्ती करू शकतो काय ? | होय. |
| २. | आदेश काय ? | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

## का र ण मी मां सा

**५.** प्रस्तुतचा दावा वादी यांनी सरस निरस मानाने तुटक वाटप होवून तुटक कब्जा मिळणेकरीता व निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे.

अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुतचा दावा दि. १६.१०.२०२५ रोजी दाखल केलेला आहे. वादीने अर्जासोबत नोंदणीकृत खरेदीखत क्र. ५३९८/२०२५ दि. १७/१०/२०२५ ची प्रमाणित प्रत सादर केलेली आहे. सदर खरेदी खताचे अवलोकन केले असता सदरचे खरेदीखत यातील प्रतिवादी क्र. १ याने तेजस दिलीप शिंदे यास दि. १७.१०.२०२५ म्हणजेच दावा दाखल तारखेच्या दुसरे दिवशी करुन दिल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे. सदर खरेदीखतामधील मिळकत ही प्रस्तूत दाव्यातील वाद मिळकतीपैकी १आर क्षेत्राचे असल्याचे दिसत आहे. प्रस्तूत दाव्याचे स्वरुप वाटणी होवून ताबा मिळणेबाबत असल्यामुळे तांत्रीक बाबी टाळण्यासाठी सदर खरेदी घेणार हा या दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार आहे. सदरचा अर्ज नामंजूर केल्यास सदरचा दावा तांत्रीक बाबींवर खारीज होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रस्तूत दाव्यात प्रतिवादींना समन्स जाणे बाकी असल्यामुळे प्रतिवादींना सदर खरेदीखताच्या अनुषंगाने बचाव घेवून पुरावा देण्याची संधी मिळणार आहे. सबब अर्ज मंजूर केल्यास त्याचा कोणताही विपरित परिणाम प्रतिवादींवर होणार नाही. याउलट अर्जामध्ये तथ्य नाही असे समजून अर्ज नामंजूर केला तर उपरोक्त घडामोडींबाबत चौकशी विना फेटाळल्यास त्याचा विपरीत परिणाम वादीवर होवू शकतो. असे प्रामाणिक मत व्यक्त करुन मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवुन, मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ खालील अंतिम आदेश पारीत करण्यात येतो.

नि.दि.दा.क्र. १३९/२०२५
नि.क्र. ०९

**आ दे श**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीस, अर्जामध्ये नमुद दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

३. वादींनी त्या अनुशंगाने दाव्यामध्ये पुढील तारखेपर्यंत दुरुस्ती करुन, दाव्याची दुरुस्त प्रत सादर करावी.

MAHESH ARVINDRAO KULKARNI

Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2025.12.16 16:57:21 +0530

**(एम. ए. कुलकर्णी )**

**दिनांक: १६.१२.२०२५**

**सह दिवाणी न्यायाधिश, क.स्तर,**
**कवठेमहांकाळ.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original order / judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Mrs. J. A. Salunkhe.<br>(Stenographar grade - III) |
| Court | : | Jt. C.J.J.D. and J.M.F.C.,<br>Kavathe Mahankal. |
| Date | : | 16.12.2025 |
| Order /judgment signed by P.O. on | : | 16.12.2025 |
| Order /judgment uploaded on | : | 16.12.2025 |